महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर.
क्रमांक : १८२४१ / क-१.
दिनांक : २१ डिसेंबर, २०२३.

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्र. १८२१२/ क-१, दिनांक २० डिसेंबर, २०२३.**

**<u>:: प रि प त्र क ::</u>**

सन २०२३ च्या हिवाळी अधिवेशनासाठी या सचिवालयाचे कामकाज रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२३ पासून नागपूर येथे सुरू झालेले आहे. बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी सत्र समाप्तीनंतर "क-१", "क-२", "क-३", "क-४", "ग-१", "ग-२" व "ह" या कक्षांशी संबंधित अधिकारी व आवश्यक कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त अन्य कक्षातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर संबंधित कक्षांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेने मुंबई येथे जाण्यास अनुमती देण्यात येत आहे. त्यांना प्रवासाकरिता एक दिवस देण्यात येत असून त्यानंतरच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी त्यांनी मुंबई कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे.

**सदर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करावे :-**

१) सत्र समाप्तीनंतर नागपूर येथील कार्यालय बंद होईपर्यंत उपलब्ध असलेल्या कालावधीत आवश्यक ते रेल्वे आरक्षण मिळविण्याची जबाबदारी संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांची राहील. अशी जबाबदारी सर्वस्वी "ग-१" कक्षावर टाकता येणार नाही. मात्र आवश्यकतेनुसार "ग-१" कक्षाचे सहकार्य घेण्यात यावे.

२) परतीच्या प्रवासासाठी विशिष्ट गाडी वा विशिष्ट प्रकारचे आरक्षण मिळवून देण्याची जबाबदारी "ग-१" कक्षाची राहणार नाही. संबंधितांनी व्यक्तीगत पातळीवर तसे प्रयत्न करुन आपले रेल्वे आरक्षण करावे.

३) संबंधित कक्षाची कामाच्यादृष्टीने गैरसोय होणार नाही व कक्षातील कागदपत्रांची नीट बांधाबांध करुन ती ट्रकमध्ये लोड करण्याचे काम करण्याइतपत आवश्यक कर्मचारी उपलब्ध असतील हे पाहण्याची जबाबदारी संबंधित कक्षाच्या अधिकाऱ्यांची राहील. आवश्यक ती परवानगी घेऊन अन्य कर्मचारी विशेषत: महिला कर्मचारी नागपूरहून निघून मुंबई कायालर्यात उपस्थित राहू शकतील.

..२/-

मात्र अशा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या बाबतीत सुस्पष्ट पुरेशी माहिती नागपूर कार्यालय सोडण्यापूर्वी आस्थापना कक्षास देण्याची तसेच अशाप्रकारे विहित वेळेआधी नागपूरहून मुंबईस निघालेले अधिकारी / कर्मचारी वेळीच मुंबईतील कार्यालयात हजर राहतील हे पाहण्याची जबाबदारी संबंधित कक्षाच्या अधिकाऱ्यांची राहील.

आदेशानुसार,

**(सुभाष नलावडे )**

उप सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी.